स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
ईमेल : junnarforestdn@gmail.com
फोन नंबर 02132-222063

महाराष्ट्र शासन
वनविभाग

# उप वनसंरक्षक, जुन्नर वनविभाग, जुन्नर यांचे कार्यालय

दादोजी कोंडदेव वाडा, तहसिल कार्यालयाजवळ, जुन्नर जि. पुणे

क्रमांक- अ/कक्ष-4.2/ FCA - 52/ जमीन/ 88/2022-23, दिनांक 23/ 08 /2022

प्रति,
मुख्य वनसंरक्षक(प्रा.),
पुणे.

**विषय :** Proposal for diversion of 0.27 ha. Forest land for laying underground two 500 mm dia pipeline and 450 mm dia pipeline passing through Forest Gat no. 1140 of village-Shirur, Tal-Shirur, Dist-Pune in State of Maharashtra. (FP/MH/IRRIG/149069/2021)

**संदर्भ :** 1. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष - 17/नोडल/पुणे/ आयडी-13079/ 922/2022-23 दि. 14.07.2022.

2. आपलेकडील पत्र क्र. कक्ष - 4/4.2/जमीन/FCA - 351/230, दि. 14.07.2022.

3. मुख्य अधिकारी,शिरूर नगर परिषद, घोड नदी जिल्हा पूणे यांचेकडील पत्र क्रमांक 2220/2022 दिनांक-25/07/2022.

4. वनपरिक्षेत्र अधिकारी,शिरूर यांचेकडील पत्र क्र./योजना/976/दिनांक-01/08/2022

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मुख्य अधिकारी,शिरूर नगर परिषद, घोड नदी जिल्हा पूणे यांनी 0.27 हेक्टर वनक्षेत्र पाण्याच्या भूमीगत पाईपलाईनसाठी वळतीकरण करून मिळणेसाठी भारतीय वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांनी संदर्भिय पत्रान्वये त्रुटी उपस्थित केल्या आहेत.

सदर त्रुटींची पूर्तता खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावात जोडलेली केएमएल फाईल सीडी ची तपासणी केली असता पर्यायी वनीकरण क्षेत्रावर शेतीची कामे दिसून येत आहेत.सदर पर्यायी वनीकरण क्षेत्रावर agriculture activity दिसुन येते. सदरचे पर्यायी वनीकरण क्षेत्र वनीकरण योग्य आहे काय ? याबाबत आपले स्पष्टीकरण सादर करण्यात यावे. | पर्यायी वनीकरणासाठी निवडलेले मौजे कवठे ग. नं. 1623 येथिल क्षेत्र 3.79 हेक्टर हे सदर गटातील वाटप वनक्षेत्र वगळुन उर्वरित अतिक्रमीत क्षेत्र निष्कासीत करुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदर क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नसुन सदरचे क्षेत्र पडीक आहे. तसेच सदरचे क्षेत्र हे पर्यायी वनीकरणासाठी योग्य आहे. सोबत निष्कासित केलेल्या अतिक्रमणाचा नकाशा व सातबारा |

| | | |
|---|---|---|
| | | उतारा सादर केला आहे. |
| 2 | प्रस्तावात जोडलेली KML File C.D. ची तपासणी केली असता सदय:स्थितीत असलेल्या Water treatement Plant हा सर्व्हे क्रमांक 1140 मध्ये असल्याचे दिसुन येतो तसेच सदर सर्व्हे क्रमांकाती क्षेत्र वनविभागाच्यां Boundary मध्ये असल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रस्तावात वनभंग आहे काय ? याबाबत आपले अभिप्राय सादर करण्यात यावे. | स. नं. 1140 चे क्षेत्र हे महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक REV - III - Forest - 48 / 1989 दिनांक 22 मार्च 1990 अन्वये भारतीस वन अधिनियम 1927 चे कलम 4 अंतर्गत अधिसुचित झालेले आहे. ( सोबत अधिसुचनेची छायांकित प्रत जोडली आहे )<br>तथापी सदर क्षेत्र कलम 4 अंतर्गत अधिसुचित होण्यापुर्वीच शिरुर शहर नळपाणी पुरवठा योजनेचे काम दिनांक 02/1984 रोजी सुरु होवुन मार्च 1988 रोजी पुर्ण झालेले होते. (सोबत शिरुर शहर नळपाणी पुरवठा योजना हस्तांतरण टिप्पणी सादर केली आहे )<br>तरी शिरुर नगरपरिषेदेच्या फिल्टेरेशन प्लॅन्ट व पाण्याच्या टाकीसाठी स.नं. 1140 पैकी मिळालेले क्षेत्र 1988 पुर्वी मिळाले असुन मा. जिल्हाधिकारी पुणे यांचे कडील आदेश क्र. / पम/ सीआर / 401 / 02/ दिनांक 03/10/2002 ची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.<br>शिरुर नगरपरिषेदेच्या फिल्टेरेशन प्लॅन्ट व पाण्याच्या टाकीसाठी नगरपरिषदेस वर्ग झालेले एकुण 0 हे. 90 आर क्षेत्र नगरपरिषदेच्या प्रत्यक्ष ताबा व वहीवाटीस आहे. सातबारा अभिलेखा नुसार एकुण 27.11 हेक्टर क्षेत्रापैकी 1. 00 हेक्टर क्षेत्र मुख्याधिकारी शिरुर नगरपरिषद शिरुर ( पाण्याची टाकी) व सरकार यांचे नावे असुन 26.11 हेक्टर क्षेत्र वनविभागाचे नावे असून पाण्याच्या टाकीचे वनक्षेत्रावर अतिक्रमण नाही. ( सोबत सातबारा अभिलेखा प्रत ) |

वरिलप्रमाणे त्रुटींची पूर्तता केली असून, सदरचा अहवाल 4 प्रतीमध्ये मान्यतेसाठी केंद्र शासनास यथोचित मार्गाने सादर होणेस विनंती आहे.

सोबत - वरीप्रमाणे

(अमोल सातपुते)
उप वनसंरक्षक,
जुन्नर वनविभाग, जुन्नर

**प्रत** - मुख्याधिकारी शिरुर नगरपरिषद घोडनदी, ता. शिरुर जि. पुणे यांना माहितीसाठी .